RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ३२

दि. २२ मे २०२६, वार : शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## संगमेश्वर विद्यामंदिरचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



**लातूर/प्रतिनिधी** :र महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्यावतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, या परीक्षेत येथील संगमेश्वर विद्यामंदिरच्या १८ विद्यार्थ्यांनी यात घवघवीत यश संपादन केले आहे.

श्रेयश किशोर गायकवाड हा २१४ गुण मिळवत विद्यालयात प्रथम, सोमेश्वर कल्याण राजे २१२ द्वितीय, धम्मदीप रवी मस्के हा २१० गुण मिळवत विद्यालयात तृतीय आला आहे. तसेच साईनाथ सुक्राचार्य पाटील याने २०८ गुण, शफिक मुक्तार शेख २००, कृष्णा संदिप गरड २००, यासेर नासेर शेख २००, स्वरा राहुल शिंदे २००, आकाश गणेश पारवे १९८, जान्हवी प्रशांत माडजे १९८, शरण्या नितीन वाघमारे १९६, वेदिका सदाशिव पांचाळ १९२, जाहेद अकबर शेख १९२, निता जनार्दन सूर्यवंशी १८४, ओमकार मनोहर शिंदे १७८, समृध्दी गिरीधर पांचाळ १७६, प्रज्ञा रामराव घोलप १७० तर गणेश संतोष धवन याने १६२ गुण मिळविले आहेत.

या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, सहसचिव आर. व्ही. जायेभाये, कोषाध्यक्ष कविता केंद्रे, संचालक प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, मुख्याध्यापक ए. व्ही. पवार, ए. व्ही. माने, जे. जी. कावळे, डी. एस. भदभदे, जी. बी. मोरे, एन. आर. मुंडे आदिंनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

## सांगलीत चक्क १९ लाखांचा मोबाईल टॉवर चोरीला; मिरज तालुक्यातील आरग येथील धक्कादायक प्रकार

**सांगली/प्रतिनिधी** : सांगलीत चोरी होणे ही काही आता औत्सुक्याचा विषय उरलेला नाही. यावर फारशी चर्चाही आता होत नाही. कारण ही नित्याची बाब ठरली आहे. कधी सोन्याचे दागिने, कधी पैसे, तर कधी दुचाकी, चारचाकी यांची चोरी ही नित्याची बाबच आहे. मात्र, मिरज तालुक्यातील आरग येथे चक्क मोबाईल टॉवरचीच चोरी झाली असून लोखंडी सांगड्यासह १९ लाख ६० हजाराचा ऐवज लंपास करण्यात आल्याची तक्रार मिरज ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आल्याची माहिती गुरूवारी मिळाली. आरग येथे आरग ते विशाल ढाब्याकडे जार्णाया रस्त्यालगत देवदास माने यांच्या गट नंबर ८३५ या शेतात रस्त्याकडेला जिओ मोबाईलचा टॉवर उभारण्यात आला होता. हा टॉवर गेले कित्येक दिवस या ठिकाणी ध्वनीलहरी एकत्रित करून ग्राहकांच्या भ्रमणध्वनीपर्यंत पोहचविण्याचे काम करत होता. मात्र, गेल्या काही दिवसात मोबाईलवरील ध्वनीलहरींचे प्रम ाण क्षीण झाल्याचे दिसत होते. कंपनीच्या अधिर्कायांनी टॉवर उभा केलेल्या ठिकाणी जाउन पाहणी केली असता मोबाईल टॉवरच गायब झाल्याचे आढळून आले. या टॉवरची चोरी झाल्याचे दिसून आले. अज्ञातांनी टॉवरसाठी असलेल्या साडेतीन लाखाच्या पाच बॅर्टया, सहा लाख २० हजाराचे पाचजी नेटवर्क अँटैना, केबल, ७० हजाराचा कळफलक, २ लाख ४० हजाराचा कक्ष, २ लाख ९० हजाराचे जनरेटर याच्यासह १ लाख ३० हजार रूपये खर्च करून उभारण्यात आलेला लोखंडी सांगाडाही गायब केला आहे. याबाबत सुमित डिजिटल इन्फ्राचे अधिकारी विशाल चव्हाण यांनी मिरज ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

## नीट पेपर फुटीचे धागेदोरे आता अंबाजोगाईत; दोन संशयित विद्यार्थ्यांची सीबीआयकडून कसून चौकशी

**बीड/प्रतिनिधी** : देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट (वैद्यकीय पात्रता परीक्षा) पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे आता बीड शहरासह अंबाजोगाईपर्यंत पोहोचले आहेत. या हायप्रोफाईल प्रकरणाचा तपास करणाऱ्या केंद्रीय अन्वेषण विभागाने आज अंबाजोगाईत धडक कारवाई केली. सीबीआयच्या पथकानं शहरातील दोन संशयित विद्यार्थ्यांची तब्बल दोन तास कसून चौकशी केल्यानं संपूर्ण जिल्ह्यात तसेच शैक्षणिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

संशयित विद्यार्थ्यांची तब्बल दोन तास कसून चौकशी : मिळालेल्या माहितीनुसार, सीबीआयचे विशेष तपास पथक आज (२१ मे) सकाळी अत्यंत गुप्तपणे अंबाजोगाई शहरात दाखल झाले. स्थानिक पोलिसांनाही फारशी माहिती न देता सीबीआयनं थेट संशयित विद्यार्थ्यांचा शोध घेत कारवाई सुरू केली. पथकाने दोन विद्यार्थ्यांना ताब्यात घेऊन एका अज्ञात ठिकाणी त्यांची जवळपास दोन तास सखोल चौकशी केली.

# नीट २०२६ पेपरफुटी प्रकरण : लातूरमधील बालरोगतज्ज्ञ डॉ. मनोज शिरूरे यांना अटक

**लातूर/प्रतिनिधी** : नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने धडाधड मोठी कारवाई सुरू केली आहे. लातूर, पुणे, नाशिक आणि नांदेडमध्ये धाडसत्र करत सीबीआयने अनेकांची धरपकड केली आहे. कोचिंग क्लासेसनाही टाळं ठोकलं आहे. तसेच धरपकड करण्यात आलेले हे सर्वजण पेपरफुटी प्रकरणाशी संबंधित आहेत. त्यांनीच पेपर फोडून तो विकल्याचा आरोप आहे. मात्र, या प्रकरणात आता मोठी अपडेट येत आहे. सीबीआयने पहिल्यांदाच या प्रकरणात पालकावर कारवाई केली आहे. डॉ. मनोज शिरूरे यांना पोलिसांनी अटक केली आहे. कोण आहेत हे मनोज शिरूरे? काय करतात? याचाच घेतलेला हा आढावा.



मनोज शिरूरे यांना सीबीआयने लातूरमधून अटक केली आहे. त्याने या प्रकरणातील आरोपी शिवराज मोटेगावकर याच्याकडून पेपर घेतल्याचा आरोप आहे. मुलासाठी त्याने पेपर घेतल्याचा आरोप आहे. ही माहिती सीबीआयला मिळताच सीबीआयने त्याला बेड्या ठोकल्या आहेत. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात आणि वैद्यकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. डॉक्टर असलेले पालकही आपल्या मुलांसाठी शॉर्टकटचा मार्ग अवलंबत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

डॉ. मनोज शिरूरे हे बालरोग तज्ज्ञ आहेत. ते मूळचे लातूरचे रहिवशी आहेत. लातूरच्या जुना औसा रोड विभागात त्यांचं सिद्धिविनायक बाल रुग्णालय आहे. त्यांचं रुग्णालय चांगलं चालतंही. नीट पेपरफुटीचं प्रकरण समोर आल्यानंतर गेल्या आठ दिवसापासून लातूरमध्ये सीबीआय तळ ठोकून आहे. सीबीआयने आधी मोटेगावकरांची कसून चौकशी केली आणि त्यानंतर त्याला अटक केली. त्यानंतर त्याच्याकडून सीबीआयने असंख्य माहिती मिळवली. त्याची कडी जोडत सीबीआय डॉ. शिरुरेपर्यंत पोहोचली. सीबीआयने काल संध्याकाळी शिरुरे यांच्या रुग्णालयावर छापा टाकला. त्यानंतर त्यांची साडे चार तास कसून चौकशी केली. त्यांना उलटे सुलटे प्रश्न विचारले. त्यानंतर त्यांनी गुन्ह्याची कबुली देताच सीबीआयने त्यांच्या मुसक्या आवळल्या. पालकांवर होणारी ही पहिलीच कारवाई असल्याने लातूरसह अख्खा महाराष्ट्र हादरून गेला आहे.

चौकशी सुरू असतानाच सीबीआयने शिरूरे यांच्याकडील मोबाईल जप्त केला. त्याने कुणाकुणाला संपर्क साधला होता. मोटेगावकरांशी कधीपासून संपर्कात होता आणि कुणा कुणाला नीटचे पेपर विकले का? किंवा व्हायरल केले का? याचा तपास सीबीआय करणार आहे. तसेच त्याच्या रुग्णालयातून सीबीायने महत्त्वाचे कागदपत्रेही जप्त केली आहे. सीबीआयकडून त्याचे बँक अकाऊंटही चेक केले जाणार आहेत. त्याने मोटेगावकरांशी आर्थिक व्यवहार केले होते का? केले होते तर कितीचे केले होते? याची माहिती सीबीआय गोळा करणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं.

## चिकनचे दुकान, पोत्यात भरलेला मृतदेह अन् दुपट्ट्याने आवळलेला गळा; तुर्भेमध्ये २४ तासात आरोपीला अटक

**मुंबई/प्रतिनिधी** : तुर्भे परिसरातील ६० वर्षीय महिलेची हत्या करून तिच्या गळ्यातील सोन्याचे दागिने लुटणाऱ्या मोबिन नूर कुरेशी याला तुर्भे एमआयडीसी पोलिसांनी अवघ्या २४ तासांत अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती. महिलेच्या अंत्यसंस्कारावेळी संतप्त नातेवाईकांनी काही काळ रस्त्यावर आंदोलनही केले होते. हत्या केल्यानंतर मृतदेह पोत्यात भरुन ठेवण्यात आला होता. तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आबासाहेब पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मोबिन नूर कुरेशी हा चिकन दुकानात काम करत होता. त्याने अनेकांकडून कर्ज घेतले होते आणि ते फेडण्यात तो अपयशी ठरत होता. दरम्यान, संबंधित महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने पाहून त्याने लूट करण्याचा कट रचला.

महिला लवकर विसरभोळी असल्याची माहिती आरोपीला होती. त्यामुळे त्याने तिला चहा पिण्याच्या बहाण्याने घरी बोलावले. घरात नेल्यानंतर तिच्या गळ्यातील दागिने काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, महिलेने विरोध केल्याने आरोपीने तिच्याच दुपट्ट्याने गळा आवळून हत्या केली.

## दर्गा बांधकामासाठी गुलाब बाबा शेख यांच्याकडून पाच लाखांची देणगी



**अक्कलकोट/प्रतिनिधी** : ख्वाजा पीर सैफुल मुलुख दर्गा, ता. अक्कलकोट जि. सोलापूर येथील दर्गा बांधकामासाठी गुलाब बाबा शेख यांच्या तर्फे ५ लाख रुपयांची देणगी देण्यात आली. या देणगीमुळे दर्ग्याच्या बांधकाम कार्याला मोठा हातभार लागणार असून परिसरातील भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दर्गा परिसराच्या विकासासाठी तसेच धार्मिक आणि सामाजिक कार्याला चालना मिळावी या उद्देशाने ही देणगी देण्यात आल्याचे सांगण्यात आले. दर्गा समितीच्या वतीने गुलाब बाबा यांचे आभार मानण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी दर्ग्याचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर भाविकांसाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त केला. धार्मिक स्थळांच्या विकासासाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढे यावे, असे आवाहनही करण्यात आले.

## लातूर पोलीस दलात ३१५ पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या प्रशासकीय बदल्या

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर जिल्हा पोलीस दलामध्ये पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या अडचणी, कौटुंबिक परिस्थिती, सेवा कालावधी तसेच प्रशासकीय गरजा लक्षात घेऊन अत्यंत पारदर्शक, संवेदनशील व सकारात्मक पद्धतीने प्रशासकीय बदल्यांची प्रक्रिया राबविण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या प्रक्रियेमुळे संपूर्ण लातूर पोलीस दलात समाधानाचे व सकारात्मकतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

जिल्ह्यातील श्रेणी पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस अंमलदार अशा एकूण ३१५ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या सध्याच्या पोलीस ठाणे अथवा शाखेमध्ये ०५ वर्षे व त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण केली होती. महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय व परिपत्रकातील मार्गदर्शक तत्वांनुसार या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्यांची प्रक्रिया राबविण्यात आली. आस्थापना मंडळाच्या बैठकीत प्रत्येक पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या सेवाभिलेखाचा बारकाईने अभ्यास करण्यात आला. पोलीस ठाणेनिहाय उपलब्ध रिक्त पदे, संबंधितांची कार्यक्षमता, कौटुंबिक अडचणी, आरोग्य विषयक बाबी, मुलांचे शिक्षण, प्रवासाची गैरसोय तसेच वैयक्तिक अडचणी यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात आला.

विशेष बाब म्हणजे, या बदल्यांच्या प्रक्रियेमध्ये संबंधित अधिकारी व अंमलदारांना आवश्यक कागदपत्रांसह समक्ष आज्ञांकित कक्षामध्ये बोलावून त्यांची बाजू ऐकून घेण्यात आली.आस्थापना मंडळाने सर्वानुमते शिफारशी केल्या. त्यानंतर पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी प्रशासकीय दृष्टीकोन ठेवून अंतिम निर्णय घेत बदल्यांचे आदेश निर्गमित केले.

या प्रक्रियेमध्ये जवळपास सर्वच पोलीस अधिकारी व अंमलदार त्यांचे पसंतीप्रमाणे पोलीस ठाणे/शाखेमध्ये बदली देण्यात आल्यामुळे पोलीस दलात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या वैयक्तिक अडचणी दूर होण्यास मदत झाल्याने संबंधित कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. बदल्या झाल्यानंतर संबंधित अधिकारी व अंमलदार नव्या ठिकाणी अधिक सकारात्मक ऊर्जा, कार्यक्षमता व जबाबदारीने काम करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत असून नागरिकांना अधिक तत्पर, प्रभावी व गुणवत्तापूर्ण पोलीस सेवा उपलब्ध करून देण्यासाठी अशा संवेदनशील व पारदर्शक निर्णयांची मोठी मदत होणार आहे.



महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना, मुख्यालय लातूर – (शासनमान्य प्राप्त) संघटनेच्या आझाद मैदान मुंबई येथील आंदोलनाला यश वैद्यकीय शिक्षण विभागातील परिचारीकांची बदली फक्त विनंती व तक्रार आधारावरुन होणार असा निर्णय काल दि. २० मे २०२६ रोजी आंदोलनाच्या धर्तीवर मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री व मा. अवर मुख्य सचिव यांच्या बैठकीत झाला. असे मा. अवर मुख्य सचिव यांनी बैठकीच्या सुरुवातीलाच सांगितले. तदनंतर इतर प्रलंबित शैक्षणिक व शुश्रुषा विषयावर अत्यंत आवश्यक व सकारात्मक चर्चा झाली.

# वृक्षारोपण मोहिमेसाठी योग्य ‘लँड बँक’ तयार करा-जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड

## मनरेगा अंतर्गत महिला बचत गटांची घेतली जाणार मदत

**लातूर/प्रतिनिधी** :राज्यात सन २०२६ ते २०४७ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या अत्यंत महत्त्वाकांक्षी ३०० कोटी वृक्षारोपण अभियानाच्या पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील वृक्षारोपण योग्य जमिनीची ‘लँड बँक’ तयार करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी आयोजित बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणा व विभागांना या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सूक्ष्म नियोजनाचे निर्देश दिले.

रोहयोचे उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक संजय इंगळे, लातूर शहर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, सामाजिक वनीकरण विभागाचे उपवन संरक्षक अमितराज जाधव, सहायक वनसंरक्षक मदन क्षीरसागर, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणेचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेलार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

सन २०२६ ते २०४७ या दीर्घकालीन कालावधीत संपूर्ण राज्यात ३०० कोटी वृक्षलागवड करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या अनुषंगाने लातूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये शासकीय कार्यालय परिसर, खुल्या व मोकळ्या जागा, रस्त्यांच्या दुतर्फा असलेली जमीन, गायरान जमिनी, पडीक जमिनी तसेच वृक्षलागवडीसाठी स्वतःहून इच्छुक असणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनींची अचूक निवड व सर्वेक्षण तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी दिल्या. आगामी २५ मे ते ०५ जून २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील वृक्षलागवडीसाठी उपलब्ध सर्व जमिनींची अचूक माहिती संकलित करून जीआयएस प्रणाली आधारे ‘लँड बँक’ तयार करावी. ही डिजिटल बँक तयार झाल्यानंतर जिल्ह्यातील सर्व संबंधित शासकीय यंत्रणा व विभागांना त्यांच्या क्षेत्रातील वृक्षलागवडीचे निश्चित उद्दिष्ट वाटप करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.




वृक्षारोपणाची ही सर्व कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत राबविण्यात यावीत. या संपूर्ण मोहिमेमध्ये स्थानिक महिला बचत गटांचा सक्रिय सहभाग निश्चित करण्यात यावा. त्यांच्यामार्फत रोपवाटिका निर्मिती, वृक्षलागवड व पुढील संगोपनाचे काम करून घेण्यात यावे, ज्यामुळे ग्रामीण भागातील महिलांना हक्काचा रोजगार मिळून महिला सक्षमीकरणालाही बळ मिळेल, असे जिल्हाधिकारी म्हणाले.

या बैठकीला विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, वनविभागाचे प्रतिनिधी आणि संबंधित यंत्रणांचे समन्वयक उपस्थित होते.

संपादकीय...

## अंतराळातील नवी 'दृष्टी'

भारतीय स्टार्टअपने विकसित केलेल्या 'दृष्टी' या उपग्रहाने भारतीय अंतरिक्ष तंत्रज्ञान क्षमतेविषयी जागतिक पातळीवर नव्याने चर्चा सुरू झाली आहे. भारतीय अंतरिक्ष क्षेत्रात गेल्या काही वर्षांत मोठे परिवर्तन घडताना दिसत आहे. एकेकाळी केवळ सरकारी संस्थांच्या कक्षेत मानले जाणारे हे क्षेत्र आता खासगी उद्योग, नवउद्योग आणि तरुण संशोधकांसाठीही नवी दारे उघडत आहेत. भारतीय स्टार्टअपने विकसित केलेल्या 'दृष्टी' या उपग्रहाने या बदलाला नवे परिमाण मिळवून दिले आहे. अमेरिकेतील स्टारलिंकच्या रॉकेटद्वारे या उपग्रहाचे प्रक्षेपण झाले आणि त्यानंतर भारतीय अंतरिक्ष तंत्रज्ञान क्षमतेविषयी जागतिक पातळीवर नव्याने चर्चा सुरू झाली. 'दृष्टी' ही एक मोठी वैज्ञानिक उपलब्धी आहे. भारतीय तरुण संशोधकांच्या कल्पकतेचा आणि स्वावलंबी तंत्रज्ञान क्षमतेचा महत्त्वपूर्ण पुरावा म्हणून याकडे पाहिले पाहिजे. या उपग्रहाचे महत्त्व समजून घेण्यासाठी प्रथम पारंपरिक उपग्रह संवेदकांची कार्यपद्धती समजून घेणे आवश्यक ठरते. सामान्यतः पृथ्वी निरीक्षणासाठी वापरले जाणारे उपग्रह दोन प्रमुख तंत्रज्ञानांवर आधारित असतात. पहिले म्हणजे, ऑप्टिकल संवेदक आणि दुसरे म्हणजे सिंथेटिक अपार्चर रडार अर्थात एसएआर तंत्रज्ञान. ऑप्टिकल संवेदक हे साधारण कॅमेर्‍याप्रमाणे कार्य करतात. सूर्यप्रकाशाच्या परावर्तनाच्या आधारे ते पृथ्वीची छायाचित्रे टिपतात. त्यामुळे मिळणारी चित्रे स्पष्ट आणि मानवी डोळ्यांना सहज समजणारी असतात; मात्र या तंत्रज्ञानाची मर्यादा म्हणजे ढगाळ वातावरण, धूर किंवा अंधारात ते प्रभावीपणे कार्य करू शकत नाही. याउलट एसएआर तंत्रज्ञान मायक्रोवेव्ह संकेतांचा वापर करते. हे संकेत ढग, धूर आणि पावसाच्या थरांमधून सहज जाऊ शकतात. त्यामुळे दिवस-रात्र आणि कोणत्याही हवामानात पृथ्वीचे निरीक्षण करणे शक्य होते. आपत्ती व्यवस्थापन, सीमावर्ती भागांवरील लक्ष, कृषी निरीक्षण आणि पर्यावरणीय बदलांचा अभ्यास यासाठी ही प्रणाली अत्यंत उपयुक्त मानली जाते; मात्र एसएआरमधून मिळणारी चित्रे सामान्य छायाचित्रांसारखी नसतात. ती अधिक तांत्रिक स्वरूपाची असल्याने त्यांचे विश्र्लेषण करण्यासाठी विशेष प्रशिक्षण आणि तांत्रिक कौशल्य आवश्यक असते. 'दृष्टी'चे वैशिष्ट्य म्हणजे या दोन्ही तंत्रज्ञानांचा एका उपग्रहात यशस्वी संगम घडवून आणला आहे. ऑप्टिकल आणि एसएआर संवेदक एकाच वेळी एकाच स्थळाचे निरीक्षण करतात. गॅलेक्सीआयने या तंत्रज्ञानाला 'ऑप्टोएसएआर' असे नाव दिले आहे. पूर्वी या दोन तंत्रज्ञानांतील माहिती एकत्र करण्यासाठी वेगवेगळ्या उपग्रहांकडून वेगवेगळ्या वेळेला मिळालेल्या चित्रांचा आधार घ्यावा लागत असे. त्यामुळे अनेकदा माहितीमध्ये विसंगती निर्माण होत असे. 'दृष्टी'ने ही समस्या मोठ्या प्रमाणात दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. या तंत्रज्ञानाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर. एखाद्या वेळी ढग किंवा अंधारामुळे ऑप्टिकल संवेदक कार्य करू शकत नसल्यास एसएआर डेटाच्या आधारे ऑप्टिकलसदृश चित्रे तयार करण्याची क्षमता या प्रणालीत विकसित केली आहे. त्यामुळे उपग्रहातून मिळणारी माहिती अधिक सुलभ आणि व्यापक वापरासाठी उपयुक्त ठरू शकते. चेन्नईस्थित अग्निकुल कॉसमॉसने थ्रीडी प्रिंटेड रॉकेट इंजिन विकसित करून लक्ष वेधले, तर हैदराबादस्थित स्कायरूट एरोस्पेसने खासगी रॉकेट प्रक्षेपणाच्या दिशेने मोठी प्रगती साधली आहे. त्याचबरोबर पिक्सेल (नवी दिल्ली), ध्रुवा स्पेस (हैदराबाद) आणि बेलाट्रिक्स एयरोस्पेस (बेंगळुरू) यांसारख्या कंपन्याही उपग्रह आणि प्रणोदन तंत्रज्ञानात नवे प्रयोग करत आहेत. या सर्व प्रयत्नांमुळे भारतात वेगाने विकसित होणारी एक मजबूत अंतराळ अर्थव्यवस्था आकार घेत आहे. 'दृष्टी'चे प्रक्षेपण हे भारतीय स्टार्टअप क्षेत्राच्या आत्मविश्र्वासाचे प्रतीक आहे. मर्यादित साधनसंपत्ती असूनही कल्पकता, संशोधन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या जोरावर जागतिक स्तरावर प्रभाव निर्माण करता येतो, हे या यशाने सिद्ध केले आहे. भारतासाठी हा नव्या अंतराळयुगाचा प्रारंभ मानला जात आहे.

# एतं बुद्धानं सासनं...

भारतीय समाजावर अंधश्रद्धा व कर्मकांडाचा प्रभाव आहे. त्यामुळेच समाजाला खरात व त्यासारखे तत्सम भोंदू बाबा फसवत असतात. तर्कसंगत आणि विवेकी समाज निर्मितीसाठी समस्त मानवाने,तथागतांच्या शासनात यावे. तथागत गौतम बुद्धांच्या शिकवणीचा केंद्रबिंदू मानव आहे. गौतम बुद्ध यांनी दिलेले सासन म्हणजे केवळ धर्मोपदेश नसून, ते मानवाला दुःखमुक्त, विवेकी, करुणामय आणि नैतिक जीवन जगण्याची शिकवण देणारे आहे.''सासन'' या शब्दाचा अर्थ शिकवण, मार्गदर्शन किंवा आचरणासाठी दिलेली दिशा असा होतो. बुद्धांचे संपूर्ण सासन मानवकेंद्रित आहे. त्यांनी कोणत्याही अलौकिक शक्तीवर अवलंबून राहण्याऐवजी माणसाने स्वतःच्या बुद्धीने, प्रज्ञेने आणि सत्कर्माने स्वतःचा विकास करावा असे सांगितले. बुद्धांनी मानवाच्या जीवनातील दुःख ओळखले. जाती, जरा, व्याधी आणि मृत्यू या दुःखांच्या कारणांचा शोध घेत त्यांनी मानवाला दुःखमुक्तीचा मार्ग दाखविला. त्यांनी सांगितले की, दुःखाचे मूळ तृष्णा आहे.तृष्णेचा नाश केल्यास दुःखाचा अंत होतो. ही शिकवण कोणत्याही जाती, धर्म, लिंग किंवा वर्गापुरती मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीसाठी आहे. म्हणून बुद्धांचे सासन सार्वत्रिक आणि मानवतावादी आहे.

बुद्धांनी मानवाला अंधश्रद्धा, कर्मकांड, जातिभेदापासून दूर राहण्यास सांगितले. त्या काळात समाजात वर्णव्यवस्था, अस्पृश्यता आणि धार्मिक कर्मकांड यांचा मोठा प्रभाव होता. परंतु बुद्धांनी ''मनुष्य जन्माने श्रेष्ठ नसतो, तर कर्माने श्रेष्ठ ठरतो'' हा महान विचार दिला. त्यामुळे त्यांच्या शिकवणीत मानवाचे मूल्य सर्वोच्च मानले गेले. त्यांनी प्रत्येक व्यक्तीला समानतेची वागणूक दिली. विविध स्तरातील लोकांना संघात स्थान देऊन त्यांनी मानवतेचा आदर्श निर्माण केला. बुद्धांच्या सासनामध्ये पंचशील, अष्टांगिक मार्ग आणि करुणा,मैत्री यांना विशेष महत्त्व आहे. पंचशील मानवाला नैतिक जीवन जगण्याची दिशा देते. शिकवणीमुळे समाजात शांतता आणि सदाचार निर्माण होतो. अष्टांगिक मार्ग मानवाला योग्य विचार, योग्य आचरण आणि योग्य जीवनपद्धती शिकवतो. त्यामुळे व्यक्तीचे मानसिक आणि सामाजिक जीवन सुधारते. शीलवान समाज निर्माण होतो.बुद्धांनी ''अत्त दीपो भव'' म्हणजे ''स्वतःच स्वतःचा दीप बना'' असा संदेश दिला. या संदेशातून त्यांनी मानवाला स्वावलंबन, आत्मपरीक्षण आणि विवेकशीलता शिकवली. त्यांनी कोणत्याही गोष्टीवर आंधळा विश्वास ठेवू नका, तर स्वतः अनुभव घेऊन सत्य स्वीकारा असे सांगितले. ही शिकवण वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणारी आहे. आजच्या काळात बुद्धांचे सासन अधिक महत्त्वाचे वाटते. हिंसा, द्वेष, असमानता, व्यसनाधीनता आणि तणावाने ग्रस्त समाजाला बुद्धांची करुणा, मैत्री आणि मानवता यांची शिकवण मार्गदर्शक ठरते. मानवाने मानवाशी प्रेमाने वागावे, सर्वांच्या कल्याणाचा विचार करावा आणि नैतिकतेने जीवन जगावे हा बुद्धांचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. तथागत गौतम बुद्धांचे सासन हे मानवकल्याणासाठीचे महान तत्त्वज्ञान आहे. बुद्धांचे सासन मानवाला माणूस म्हणून जगण्याची सर्वोत्तम दिशा देणारे आहे. बुद्धांच्या उपदेशात विश्वातील सर्व मानवाचे हित सामावलेले आहे. त्यांचा धम्म सार्वत्रिक आणि मानवकल्याणकारी आहे.बुद्धांनी अहिंसा, करुणा, मैत्री आणि समता यांचा प्रचार केला. ''सर्व प्राणी सुखी होवोत'' ही त्यांची भावना होती. त्यांनी कोणत्याही जीवाचा द्वेष करू नये, हिंसा करू नये आणि सर्वांशी प्रेमाने वागावे असे सांगितले. आज जगात युद्ध, दहशतवाद, जातीयवाद आणि द्वेष वाढत असताना बुद्धांची मैत्री आणि करुणेची शिकवण मानवजातीसाठी अत्यंत आवश्यक ठरते. बुद्धांनी जातिभेद आणि अंधश्रद्धेला विरोध केला. उपाली, सुनीत, अंगुलीमाल , आम्रपाली यांसारख्या विविध स्तरातील लोकांना संघात स्थान देऊन त्यांनी मानवतेचा आदर्श निर्माण केला. ही शिकवण आजच्या लोकशाही आणि मानवाधिकारांच्या मूल्यांशी सुसंगत आहे.सत्य, संयम, प्रामाणिकपणा आणि व्यसनमुक्ती यामुळे समाजात शांतता निर्माण होते. बुद्धांनी लोभ, मोह आणि क्रोध यांपासून दूर राहण्याचा उपदेश केला. त्यामुळे मानवाचे मन शुद्ध होते आणि समाजात सद्भावना वाढते.आज जगभरात बुद्धांचे विचार स्वीकारले जात आहेत. अनेक देशांमध्ये शांतता, मानवता आणि सहअस्तित्वासाठी बुद्धांच्या तत्त्वांचा अभ्यास केला जात आहे . कारण बुद्धांचा धम्म हा संपूर्ण विश्वातील मानवाच्या हिताचा मार्ग आहे.नैतिक जीवन जगण्याची दिशा देणारा आहे. त्यांच्या शिकवणीत संपूर्ण विश्वातील मानवाचे कल्याण सामावलेले आहे. म्हणून बुद्धांचे विचार हे विश्वमानवतेसाठी दीपस्तंभ आहेत.बुद्धाचे तत्त्वज्ञान सार्वभौम आहे, सर्वांगसुंदर आहे आणि सम्यक सदाचाराने ओथंबलेले आहे. त्यामध्ये मानवतेचे सौंदर्य, करुणा, समता आणि सदाचार यांचा अद्भुत संगम दिसून येतो.तृष्णेचा त्याग केल्यास मानव शांत व आनंदी जीवन जगू शकतो, असे त्यांनी सांगितले. ही शिकवण प्रत्येक मानवासाठी समान आहे. त्यामुळे बुद्धांचे तत्त्वज्ञान सार्वभौम स्वरूपाचे आहे. त्यात मानव जीवनाच्या प्रत्येक अंगाचा विचार केला आहे. वैयक्तिक जीवन, सामाजिक जीवन, नैतिकता, विचारशुद्धी, आचरण, करुणा आणि बंधुभाव या सर्व बाबींना त्यांनी महत्त्व दिले. त्यांनी केवळ उपदेश दिला नाही, तर स्वतःच्या आचरणातून आदर्श निर्माण केला. म्हणून बुद्धांचे तत्त्वज्ञान जीवन जगण्याची सुंदर कला शिकवते.बुद्धांनी सम्यक विचार, सम्यक वाणी, सम्यक कर्म आणि सम्यकआजीविका यांवर भर दिला. अष्टांगिक मार्गातील ही तत्त्वे मानवाला सदाचाराचे जीवन जगण्यास प्रेरणा देतात.''मनुष्य कर्माने श्रेष्ठ ठरतो'' हा त्यांचा विचार मानवतेचा महान संदेश आहे. त्यांनी सर्वांना समानतेने वागवले आणि करुणा व मैत्रीची शिकवण दिली. ''बहुजन हिताय, बहुजन सुखाय'' हा त्यांचा विचार मानवकल्याणासाठीच होता. आजच्या काळात बुद्धांचे तत्त्वज्ञान अधिक महत्त्वाचे वाटते. जगात वाढणारी हिंसा, द्वेष, अन्याय आणि असमानता यावर बुद्धांचे विचार प्रभावी उपाय ठरू शकतात.म्हणून जगभरात बुद्धांचे तत्त्वज्ञान आदराने अभ्यासले जाते.बुद्धाने सांगितलेले ज्ञान हे सुखाकडे नेणारी जीवनपद्धती आहे : बुद्धी, तर्क, न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि विज्ञानसंगत विचार असे दिलेले ज्ञान हे केवळ धार्मिक उपदेश नसून मानवाला दुःखमुक्त, विवेकशील आणि आनंदी जीवन जगण्याची जीवनपद्धती आहे.धम्म स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि विज्ञाननिष्ठ विचारांची शिकवण देतो. म्हणून बुद्धांचे तत्त्वज्ञान आजही आधुनिक आणि मानवकल्याणकारी मानले जाते.बुद्धांनी मानवाला विचार करण्याचे स्वातंत्र्य दिले. त्यांनी कोणतीही गोष्ट आंधळेपणाने स्वीकारू नका, तर स्वतः विचार करून सत्य जाणून घ्या असे सांगितले. बुद्धांचे तत्त्वज्ञान बुद्धी आणि तर्कावर आधारित असल्यामुळे ते विज्ञानसंगत ठरते.

बुद्धांनी समाजात न्याय आणि समतेचा विचार मांडला. बुद्धांचे ज्ञान बंधुतेची भावना निर्माण करणारे आहे. त्यांनी करुणा, मैत्री आणि अहिंसा यांचा उपदेश केला. ''सर्व प्राणी सुखी होवोत'' ही त्यांची भावना संपूर्ण मानवजातीला एकत्र बांधणारी आहे. द्वेषाला द्वेषाने नव्हे तर प्रेमाने जिंकावे, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे समाजात शांतता आणि बंधुभाव निर्माण होतो. बुद्धांनी नैतिक जीवनाची दिशा दिली. बुद्धांचे तत्त्वज्ञान विज्ञानसंगत आहे कारण त्यांनी अनुभव, निरीक्षण,कारण-परिणाम यांना महत्त्व दिले. त्यांनी चमत्कारांपेक्षा सत्य आणि व्यवहाराला प्राधान्य दिले. म्हणून बुद्धांचे विचार आधुनिक विज्ञान आणि लोकशाही मूल्यांशी सुसंगत आहे.दिशा देणारे आहे. त्यांच्या शिकवणीत मानवतेचा, विवेकाचा आणि शांततेचा मार्ग आहे. त्यामुळे बुद्धांनी सांगितलेले ज्ञान हे खऱ्या अर्थाने सुखाकडे नेणारी जीवनपद्धती आहे.ते मानवाला नैतिक, शांततामय आणि आनंदी जीवन जगण्याची प्रेरणा देते . म्हणून बुद्धांचे ज्ञान हे संपूर्ण मानवजातीसाठी कल्याणकारी आणि चिरंतन आहे.बुद्ध तत्त्वज्ञानातील करुणा, मैत्री, मुदिता आणि उपेक्षा ही तत्वे मानवाला मानवाशी मैत्रीच्या धाग्याने जोडणारे अत्युच्च विचार आहेत.या चार महान मूल्यांमुळे मानव मानवाशी प्रेम, सहकार्य आणि बंधुभावाने जोडला जातो. म्हणून बुद्ध तत्त्वज्ञानातील हा विचार मानवजातीसाठी कल्याणकारी मानला जातो. करुणा म्हणजे दुसऱ्याच्या दुःखाबद्दल मनात दया आणि मदतीची भावना निर्माण होणे. बुद्धांनी प्रत्येक मानवाने इतरांच्या वेदना समजून घ्याव्यात आणि त्यांचे दुःख दूर करण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले. करुणेमुळे मानवामध्ये मानवतेची भावना जागृत होते. हिंसा, द्वेष आणि क्रौर्य कमी होऊन समाजात प्रेम आणि सहानुभूती वाढते. बुद्धांनी जखमी, गरीब, पीडित आणि दुर्बल लोकांप्रती करुणेची शिकवण देऊन मानवतेचा महान आदर्श निर्माण केला. मैत्री म्हणजे सर्व प्राणिमात्रांशी प्रेम, सद्भावना आणि बंधुभाव ठेवणे. मैत्रीमुळे जात, धर्म, भाषा आणि वर्ण यांतील भेद दूर होतात. मानव मानवाशी प्रेमाने जोडला जातो. द्वेषाला प्रेमाने जिंकण्याचा बुद्धांचा संदेश आजही जगाला शांततेची दिशा देतो. मुदिता म्हणजे दुसऱ्याच्या यशात, आनंदात आणि प्रगतीत आनंद मानणे. अनेकदा माणूस दुसऱ्याच्या प्रगतीबद्दल मत्सर करतो, पण बुद्धांनी मत्सराऐवजी आनंद व्यक्त करण्याची शिकवण दिली. मुदितेमुळे समाजात सहकार्य, सकारात्मकता आणि परस्पर आदर निर्माण होतो. ही भावना मानवाला उदार आणि विशाल मनाचा बनवते.उपेक्षा म्हणजे समभाव ठेवणे, राग-द्वेषापासून दूर राहणे आणि मन शांत ठेवणे. जीवनात सुख-दुःख, लाभ-हानी, मान-अपमान येत असतात. अशा परिस्थितीत मन स्थिर ठेवणे ही उपेक्षा होय. बुद्धांनी समत्वाची शिकवण देऊन मानवाला मानसिक शांततेचा मार्ग दाखविला. उपेक्षेमुळे व्यक्ती विवेकशील आणि संयमी बनते. करुणा, मैत्री, मुदिता आणि उपेक्षा या चार ब्रह्मविहारांमुळे समाजात शांतता, समानता आणि बंधुभाव निर्माण होतो. या मूल्यांमुळे मानव एकमेकांशी प्रेमाच्या धाग्याने जोडला जातो. बुद्धांचे तत्त्वज्ञान कोणत्याही भेदभावाला स्थान देत नाही. ते संपूर्ण मानवजातीला एक कुटुंब मानते. ही शिकवण मानवतेचे रक्षण करणारी, समाजात प्रेम आणि शांतता निर्माण करणारी आणि विश्वबंधुत्वाची प्रेरणा देणारी आहे.बुद्धाचे सासन प्रज्ञा, शील व समाधीकडे नेणारे आहे. गौतम बुद्ध यांनी दिलेले सासन म्हणजे मानवाच्या कल्याणाचा, दुःखमुक्तीचा आणि आत्मविकासाचा मार्ग होय. मानवाला अंतर्बाह्य विकसित करणारे महान तत्त्वज्ञान बुद्ध सासनात आहे. प्रज्ञा म्हणजे सत्य जाणण्याची बुद्धी, विवेक आणि योग्य समज. बुद्धांनी विचार आणि अनुभवाला महत्त्व दिले. ''कोणतीही गोष्ट केवळ परंपरेने स्वीकारू नका; स्वतः विचार करून सत्य तपासा'' असा त्यांचा संदेश होता. त्यामुळे बुद्धांचे सासन मानवाला विवेकशील बनवते. प्रज्ञेमुळे मनुष्य चांगले-वाईट, योग्य-अयोग्य याचा विचार करू शकतो आणि योग्य मार्ग निवडू शकतो.ही शिकवण मानवाला अज्ञानातून ज्ञानाकडे घेऊन जाते. म्हणून बुद्धांचे सासन प्रज्ञेचा प्रकाश देणारे आहे.ते शीलाकडे नेणारे सासन आहे.बुद्धांनी मानवाच्या जीवनात नैतिकतेला अत्यंत महत्त्व दिले.समाधीमुळे मनातील लोभ, मोह, क्रोध आणि अस्थिरता कमी होते. बुद्धांनी सम्यक स्मृती आणि सम्यक समाधी यांचा उपदेश करून मानसिक शांतीचा मार्ग दाखविला. समाधीमुळे मनुष्य आत्मपरीक्षण करू शकतो आणि जीवनात संतुलन राखू शकतो. त्यामुळे त्याचे जीवन शांत, आनंदी आणि समाधानी बनते. प्रज्ञा, शील आणि समाधी ही बुद्धधम्माची मूलभूत त्रिसूत्री आहे. प्रज्ञेमुळे योग्य ज्ञान मिळते, शीलामुळे जीवन शुद्ध होते आणि समाधीमुळे मन शांत व स्थिर राहते. या तिन्हींचा समन्वय मानवाला परिपूर्ण जीवनाकडे घेऊन जातो. मानवाने प्रज्ञा, शील आणि समाधीचा स्वीकार केला तर वैयक्तिक तसेच सामाजिक जीवन अधिक सुंदर आणि शांततामय होईल. विश्वातील प्रत्येक मानवाने बुद्ध सासनात यावे. गौतम बुद्ध यांनी दिलेले बुद्ध सासन हे मानवाच्या कल्याणासाठी, शांततेसाठी आणि दुःखमुक्त जीवनासाठी आहे. बुद्धांचे सासन संपूर्ण मानवजातीसाठी समानतेचा, करुणेचा आणि विवेकाचा मार्ग आहे. म्हणूनच विश्वातील प्रत्येक मानवाने बुद्ध सासनातील मूल्यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. जातिभेद, धर्मभेद आणि वर्णभेद दूर करून बुद्ध सासन विश्वबंधुत्वाची भावना निर्माण करते. म्हणून बुद्ध सासन आधुनिक मानवासाठी विश्वमानवतेचे उज्वल भविष्य आहे. हे प्रत्येकाने लक्षात घ्यायला हवे.


-----------------

**किशोर कासारे**
**मंडणगड दाभट**
८७६७४२५१८०

# वैश्विक साहित्यावर पाली भाषेचा प्रभाव

जगातील विविध देश, भाषा आणि संस्कृतीतील साहित्य एकमेकांपर्यंत पोहोचू लागले. व्यापार, धर्म, प्रवास, अनुवाद आणि शिक्षण यांच्या माध्यमातून साहित्य परस्पर जोडले गेले आणि ''विश्व साहित्य'' किंवा ''वैश्विक साहित्य'' ही कल्पना उदयास आली.साहित्य एका देशापुरते मर्यादित न राहता संपूर्ण मानवजातीच्या अनुभवांना व्यक्त करते.असे साहित्य म्हणजे वैश्विक साहित्य होय.

मानवाच्या इतिहासात भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून संस्कृती, विचार, ज्ञान आणिसमाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम राहिली आहे. भारताच्या प्राचीन इतिहासात पाली भाषेला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते . पाली ही भाषा बौद्ध साहित्याची भाषा म्हणून प्रसिद्ध झाली; परंतु तिचे महत्त्व केवळ धार्मिक क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते. ती तत्कालीन गणराज्ये, जनपदे आणि सामान्य लोकांच्या व्यवहारातील लोकभाषा होती.भगवान बुद्धांनी आपल्या धम्मप्रचारासाठी जनसामान्यांना समजणारी पाली भाषा स्वीकारली. त्यामुळे पाली भाषा ही समता,मानवता आणि लोकशिक्षणाची भाषा ठरली. प्राचीन भारतात मगध, कोसल, वज्जी, मल्ल, शाक्य इत्यादी प्रदेशांमध्ये लोकांच्या दैनंदिन व्यवहारात प्राकृत स्वरूपातील भाषा वापरल्या जात होत्या. पाली(मागधी) ही त्या लोकभाषांपैकी एक प्रभावी भाषा होती. सामान्य जनता, व्यापारी, शेतकरी, स्त्रिया आणि समाजातील कनिष्ठ वर्ग यांना सहज समजेल अशी ती सोपी आणि सरळ भाषा होती. त्यामुळे पाली भाषेचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला.तथागत गौतम बुद्धांनी उपदेशासाठी लोकभाषेचा स्वीकार करून मोठी सामाजिक क्रांती घडवून आणली.''बहुजन हिताय, बहुजन सुखाय'' या तत्त्वानुसार लोकांच्या भाषेत धम्म सांगितला. त्यांनी भिक्खुना स्पष्ट सांगितले की धम्म लोकांच्या भाषेत सांगा. त्यामुळे पाली भाषा ही बौद्ध धम्माची प्रमुख भाषा बनली.बौद्ध साहित्याची निर्मिती पाली भाषेत झाली. बुद्धांच्या उपदेशांचे संकलन त्रिपीटक या महान ग्रंथात करण्यात आले. विनयपिटक, सुत्तपिटक आणि अभिधम्मपिटक हे त्रिपिटकाचे तीन भाग पाली भाषेत आहेत. या ग्रंथांमध्ये नैतिकता, मानवी मूल्ये, करुणा, प्रज्ञा, समता आणि अहिंसा यांचा संदेश दिला आहे. त्यामुळे पाली भाषा ही ज्ञान, विवेक आणि मानवमुक्तीची भाषा ठरली. पाली भाषेने भारतापुरते मर्यादित न राहता श्रीलंका, म्यानमार, थायलंड, कंबोडिया आणि इतर आशियाई देशांमध्येही मोठा प्रभाव निर्माण केला. बौद्ध भिक्खुनी पाली साहित्याचा प्रचार जगभर केला. त्यामुळे पाली ही आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक संवादाची भाषा बनली. आजही अनेक देशांमध्ये पालीचे अध्ययन केले जाते. बौद्ध विद्यापीठांमध्ये तिचे विशेष महत्त्व आहे. पाली भाषा ही केवळ धार्मिक भाषा नव्हती, तर ती सामाजिक परिवर्तनाचे साधन होती. तिने समाजातील सर्व स्तरांतील लोकांना समानतेचा अधिकार दिला. ज्ञानप्राप्तीचा मार्ग खुला झाला. बुद्धांनी लोकभाषेतून दिलेला धम्म हा लोकशाही, बंधुता आणि मानवतेचा संदेश होता. त्यामुळे पाली भाषा ही जनतेच्या सन्मानाची भाषा मानली जाते.आजच्या काळात पाली भाषेचा अभ्यास करणे म्हणजे मानवतावादी विचारांचा अभ्यास करणे होय. पाली साहित्यामध्ये नैतिक जीवन, शांतता, सहकार्य आणि विवेकशीलता यांचा मौल्यवान ठेवा आहे. आधुनिक



समाजात वाढणारी हिंसा, अंधश्रद्धा आणि असमानता दूर करण्यासाठी पाली साहित्याचे विचार अत्यंत उपयुक्त आहेत. पाली ही बौद्ध साहित्याची भाषा, गणराज्यांची व्यवहारभाषा, जनपदांची सांस्कृतिक भाषा आणि सामान्य लोकांची लोकभाषा होती.तिने ज्ञान लोकांपर्यंत पोहोचवून सामाजिक समता आणि मानवतेचा दीप प्रज्वलित केला. त्यामुळे पाली भाषेचे स्थान भारतीय आणि वैश्विक इतिहासात अत्यंत गौरवपूर्ण आहे.बौद्ध धम्मातील त्रिपिटक साहित्य आणि पाली भाषेचा प्रभाव विश्वसाहित्यावर आहे. मानवजातीच्या इतिहासात काही भाषा आणि साहित्य असे असतात की त्यांचा प्रभाव केवळ एका देशापुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण जगाच्या संस्कृतीवर आणि विचारविश्वावर पडतो. पाली भाषा आणि बौद्ध धम्मातील त्रिपिटक हे असेच एक महान साहित्य आहे. त्याचे जगातील विविध भाषांमध्ये भाषांतर झाले. त्यामुळे पाली भाषेचा प्रभाव जागतिक साहित्य, संस्कृती, तत्त्वज्ञान आणि मानवतावादी विचारांवर मोठ्या प्रमाणात पडला. त्रिपिटक म्हणजे बौद्ध धम्माचे मूलभूत साहित्य. विनयपिटक, सुत्तपिटक आणि अभिधम्मपिटक या तीन भागांमध्ये बुद्धांचे उपदेश, संघाचे नियम, नैतिक मूल्ये आणि तत्त्वज्ञान समाविष्ट आहे. हे सर्व साहित्य पाली भाषेत रचले गेले. पाली भाषा ही सामान्य लोकांची भाषा असल्यामुळे बुद्धांचे विचार लोकांपर्यंत सहज पोहोचले. भारताबाहेर विविध देशांमध्ये बौद्ध धम्माचा प्रसार श्रीलंका, म्यानमार, थायलंड, चीन, जपान, तिबेट, कोरिया आणि इतर आशियाई देशांमध्ये झाला. त्यावेळी त्रिपिटकाचे विविध भाषांमध्ये भाषांतर करण्यात आले. श्रीलंकेत पाली भाषेचे जतन मोठ्या प्रमाणात झाले. तेथील बौद्ध विद्वानांनी पाली ग्रंथांचे सिंहली भाषेत भाषांतर केले. चीनमध्ये बौद्ध भिक्खुनी पाली ग्रंथांचे चिनी भाषेत अनुवाद केले. तिबेटमध्येही बौद्ध साहित्याचे तिबेटी भाषेत भाषांतर झाले. त्यामुळे तेथील साहित्य, कला आणि संस्कृतीवर बौद्ध विचारांचा खोल परिणाम झाला. जपानमध्ये झेन बौद्ध परंपरेवर आधारित साहित्य निर्माण झाले. थायलंड आणि म्यानमारमध्ये आजही पाली भाषा धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे. पाली साहित्याच्या प्रभावामुळे जागतिक साहित्याला नवी दिशा मिळाली. करुणा, अहिंसा, समता, बंधुता आणि विवेकशीलता ही मूल्य जगभर पोहोचली. अनेक पाश्चात्त्य लेखक आणि तत्त्वज्ञ बौद्ध विचारांनी प्रभावित झाले. त्यामुळे वैश्विक साहित्यकृतींमध्ये बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव दिसून येतो.पाली भाषेचा प्रभाव केवळ साहित्यापुरता मर्यादित नाही. आधुनिक मानवतावादी आणि लोकशाही मूल्यांवरही त्याचा प्रभाव पडला आहे. बुद्धांनी सांगितलेले ''बहुजन हिताय, बहुजन सुखाय'' हे तत्त्व आज जागतिक मानवकल्याणाचे सूत्र मानले जाते.जगभरातील विद्यापीठांमध्ये पाली भाषा आणि बौद्ध अध्ययनाचे अभ्यासक्रम चालवले जातात. त्यामुळे पाली भाषा ही जागतिक बौद्धिक परंपरेचा भाग बनली आहे.त्यामुळे पाली साहित्याला नवचैतन्य मिळाले आहे. जागतिक विचारवंतांनी बुद्धांच्या समतावादी विचारांना आधुनिक सामाजिक न्यायाशी जोडले. त्यामुळे पाली साहित्य पुन्हा समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन बनले. त्रिपिटक साहित्य जगातील विविध भाषांमध्ये भाषांतरित झाल्यामुळे पाली भाषेचा प्रभाव विश्वसाहित्यात आणि जागतिक संस्कृतीत मोठ्या प्रमाणावर पडला. पाली भाषेने मानवतेचा, शांततेचा, समतेचा आणि विवेकाचा संदेश जगभर पोहोचवला. त्यामुळे पाली भाषा आणि त्रिपिटक साहित्य हे जागतिक सांस्कृतिक वारशाचे अमूल्य दालन मानले जात आहे.


-----------------

**किशोर कासारे**
**मंडणगड दाभट/८७६७४२५१८०**

## विशेष...

### समाजसुधारणेचा दीपस्तंभ : राजा राममोहन रॉय

राजा राममोहन रॉय हे भारतीय पुनर्जागरणाचे अग्रदूत मानले जातात. आधुनिक भारताच्या सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक सुधारणांचा पाया घालणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वाची जयंती म्हणजे समाजप्रबोधनाच्या कार्याची आठवण करून देणारा प्रेरणादायी दिवस होय. एकोणिसाव्या शतकात त्यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये समाज सुधारणांसाठी केलेले प्रयत्न,त्यासाठी उभारलेला सनदशीर लढा आणि कायद्याची मदत घेऊन केलेल्या समाजसुधारणा आजही प्रेरणादायी आहेत.




त्यांनी अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकाच्या संक्रमणकाळात भारतीय समाजाला नव्या विचारांची दिशा दिली. त्यांच्या विचारांमुळे भारतीय समाजात आधुनिकतेची पहाट उगवली. राजा राममोहन रॉय यांचा जन्म २२ मे १७७२ रोजी बंगालमधील राधानगर येथे झाला. त्यांचे वडील रामकांत रॉय आणि आई तारिणी देवी हे धार्मिक वृत्तीचे होते. बालपणापासूनच त्यांना संस्कृत, फारसी, अरबी, बंगाली आणि इंग्रजी भाषांचे ज्ञान प्राप्त झाले. विविध धर्मग्रंथांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. वेद, उपनिषदे, कुराण आणि बायबल यांचा तुलनात्मक अभ्यास करून त्यांनी मानवतेचा व्यापक दृष्टिकोन स्वीकारला.त्यांचा उत्कर्ष हा भारतातील सामाजिक आणि वैचारिक संक्रमणाच्या काळात झाला.

त्या काळात भारतात ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता होती. इंग्रजांचे राजकीय वर्चस्व वाढत असताना भारतीय समाज मात्र अनेक अनिष्ट प्रथा, अंधश्रद्धा आणि कालबाह्य चालीरीतींमध्ये अडकलेला होता. स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती. सतीप्रथा, बालविवाह, बहुपत्नीत्व, स्त्रीशिक्षणावरील बंदी, विधवांचा होणारा छळ, जातिभेद आणि अस्पृश्यता या सामाजिक विकृतींनी समाज पोखरला होता. धर्माच्या नावाखाली कर्मकांडांना अधिक महत्त्व आले होते. समाजात विवेकापेक्षा अंधश्रद्धेचे वर्चस्व वाढले होते.

अशा प्रतिकूल परिस्थितीत राजा राममोहन रॉय यांनी समाजसुधारणेचा ध्यास घेतला. त्यांनी स्त्रियांच्या हक्कांसाठी प्रभावीपणे आवाज उठवला. विशेषतः सतीप्रथेच्या विरोधातील त्यांचा लढा ऐतिहासिक मानला जातो. पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीला जिवंत जाळण्याची अमानवी प्रथा त्यांनी मानवतेविरुद्धचा अपराध असल्याचे ठामपणे मांडले. त्यांनी अनेक लेख, पुस्तके आणि निवेदने लिहून समाजमत जागृत केले. इंग्रजी सत्ताधाऱ्यांशी पत्रव्यवहार करून त्यांनी सतीप्रथा बंद करण्याची मागणी सातत्याने केली. त्या काळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेन्टींक यांच्याशी त्यांनी संवाद साधला. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन १८२९ मध्ये सतीप्रथेवर बंदी घालणारा कायदा लागू करण्यात आला. हा भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरला.

राजा राममोहन रॉय यांनी १८२८ मध्ये ''ब्राह्मो समाज'' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून एकेश्वरवाद, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता आणि विवेकनिष्ठ विचार यांचा प्रचार करण्यात आला. त्यांनी मूर्तिपूजा, अंधश्रद्धा आणि अवास्तव कर्मकांडांना विरोध केला. धर्म म्हणजे मानवसेवा आणि नैतिकता हा संदेश त्यांनी दिला. शिक्षण क्षेत्रातही त्यांचे योगदान मोठे आहे. त्यांनी आधुनिक शिक्षणाचा पुरस्कार केला. इंग्रजी शिक्षण, विज्ञान आणि गणित या विषयांच्या अभ्यासाला त्यांनी प्रोत्साहन दिले. भारतीय युवकांनी आधुनिक ज्ञान मिळवावे, असा त्यांचा आग्रह होता. त्यांनी हिंदू कॉलेज स्थापनेतही पुढाकार घेतला. बंगाली भाषेत अनेक ग्रंथ प्रकाशित करून त्यांनी समाजप्रबोधन केले.

''संवाद कौमुदी आणि ''मिरात-उल-अखबार''यांसारख्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर जनजागृती केली. भारतीय पत्रकारितेचे जनक म्हणूनही त्यांचा गौरव केला जातो.समाजसुधारणेच्या कार्यात त्यांना मोठा विरोध सहन करावा लागला. सनातनी मंडळींनी त्यांच्यावर टीका केली. धर्मविरोधी, परंपराविरोधी अशी त्यांची बदनामी करण्यात आली. काहींनी त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकण्याचाही प्रयत्न केला. मात्र त्यांनी विवेक, तर्क आणि मानवतेच्या आधारावर आपले कार्य अखंड सुरू ठेवले. समाजहितासाठी संघर्ष करण्याची त्यांची वृत्ती अत्यंत प्रेरणादायी होती.

राजा राममोहन रॉय यांनी इंग्लंडमधील सत्ताधाऱ्यांशी आणि विचारवंतांशीही पत्रव्यवहार केला. भारतीय समाजातील परिस्थिती, शिक्षणाची गरज आणि सुधारणांचे महत्त्व त्यांनी ब्रिटिश प्रशासनाला पटवून दिले. भारतात आधुनिक शिक्षणपद्धती सुरू व्हावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांनी पत्रकारितेच्या स्वातंत्र्याचाही पुरस्कार केला. प्रेसवरील निर्बंधांविरोधात त्यांनी आवाज उठवला.

सन १८३० मध्ये ते इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी भारतीयांच्या प्रश्नांबाबत भूमिका मांडली. इंग्लंडमधील अनेक विद्वानांनी त्यांच्या विचारांचे स्वागत केले. २७ सप्टेंबर १८३३ रोजी ब्रिस्टलजवळील स्टेपलटन येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूने भारताने एक महान समाजसुधारक गमावला; मात्र त्यांनी पेटवलेला समाजप्रबोधनाचा दीप आजही तेवता आहे. राजा राममोहन रॉय यांच्या विचारांचा प्रभाव भारतातील अनेक समाजसुधारकांवर पडला. महाराष्ट्रात महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या अनेक समाजसुधारकांनी सामाजिक परिवर्तनाची चळवळ अधिक व्यापक केली.

महाराष्ट्र अशा सामाजिक सुधारणांच्या कायम पाठीशी राहिले आहे.राजा राममोहन रॉय यांच्या विविध चळवळीचे, उपक्रमाचे, समाजसुधारणांचे महाराष्ट्राला कायम आकर्षण राहिले असून महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींना त्यांच्या कार्यकर्तृत्वाने प्रेरणा मिळाली आहे. आज महाराष्ट्र शासनही महिला सक्षमीकरण, शिक्षण आणि सामाजिक न्याय यासाठी विविध योजना राबवत आहे. महिला व बालविकास विभागामार्फत महिलांच्या सुरक्षिततेसाठी, स्वावलंबनासाठी आणि आरोग्यासाठी अनेक उपक्रम राबवले जात आहेत. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन, महिला बचतगटांचे सक्षमीकरण, बालविवाह प्रतिबंध, महिला अत्याचार प्रतिबंध, तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विविध कल्याणकारी योजना शासनाने स्वीकारल्या आहेत. ''बेटी बचाओ, बेटी पढाओ'', महिला स्वयंसहाय्यता गट, कौशल्य विकास कार्यक्रम, तसेच डिजिटल शिक्षण यांसारख्या उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.लाडकी बहीण योजनेच्या मार्फत महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाचे व त्या माध्यमातून आर्थिक सुधारणांचे नवे दालन राज्य शासनाने उघडले आहे.

सामाजिक सुधारणा ही केवळ शासनाची जबाबदारी नसून समाजातील प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. राजा राममोहन रॉय यांनी दिलेला विवेक, समानता आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. अंधश्रद्धा, भेदभाव आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा त्यांच्या जीवनातून मिळते. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सामाजिक समतेचा, स्त्री-सन्मानाचा आणि प्रबोधनाचा विचार पुढे नेण्याचा संकल्प केला पाहिजे. हेच त्यांना त्यांच्या जयंती दिनाला खरे अभिवादन ठरेल.

**-प्रवीण टाके,**
**उपसंचालक,**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोल्हापूर**
**९७०२८५८७७७**

# (नमुंमपा) सत्ताधारी नगरसेवकांचा १०० दिवसांचा कालावधी पूर्ण

## यशस्वी १०० दिवस जनसेवेचे, विश्वासाचे

**नवी मुंबई / के. एच. हनवते :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या सत्ता स्थापनेला यशस्वीरीत्या १०० दिवस पूर्ण झाले आहेत. आमचे मार्गदर्शक आणि लोकनेते, मा.राज्याचे मंत्री श्री.गणेशजी नाईक साहेब यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व व कणखर मार्गदर्शनाखाली महापौर म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर जनतेच्या विश्वासाला सार्थ ठरत, '' काम वेगात निर्णय जनतेच्या हितात !'' या ध्येयवाक्य नुसार नवी मुंबई महानगरपालिका ६.० चा पहिला १०० दिवसांचा सेवाकाळ यशस्वीपणे पूर्ण झाला आहे.




महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ नुसार महानगरपालिकेचे कामकाज पारदर्शक, शिस्तबद्ध आणि लोकाभिमुख पद्धतीने राबवले जात आहे. जनतेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत प्रत्येक निर्णय कायदेशीर चौकटीत, उत्तरदायित्वाच्या भावनेतून आणि विकासाच्या स्पष्ट दृष्टीकोनातून घेतला जात आहे. शहराच्या विविध महत्त्वाच्या विषयांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यासाठी महापालिकेच्या विविध तदर्थ समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. या समित्यांच्या माध्यमातून निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता अधिक मजबूत करण्यात आली आहे.

या निमित्ताने, गेल्या १०० दिवसांतील सेवाकार्याचा सविस्तर लेखाजोखा पत्रकार परिषदेच्या माध्यमातून आम्ही जनतेसमोर सादर केला. या अल्प कालावधीत '' काम वेगात, निर्णय जनतेच्या हितात '' ह्या सूत्रानुसार शहर विकासाच्या दृष्टीने, विशेषतः पायाभूत सुविधा, शिक्षण, पर्यावरण संवर्धन आणि महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात अनेक ऐतिहासिक व महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. हा केवळ सुरुवातीचा टप्पा असून, नवी मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी, जनतेच्या हितासाठी आणि आगामी काळातही विकासकामांचा वेग अधिक गतीने, अधिक प्रभावी आणि अधिक जनकेंद्री ठेवण्याचा आमचा निर्धार कायम राहील.

याप्रसंगी महापौर : सुजाता (ताई) पाटील, तसेच उपमहापौर श्री.दशरथजी भगत, सभागृह नेते श्री. सागरजी नाईक, माजी महापौर श्री. जयवंतजी सुतार, आरोग्य समिती सभापती श्री. डॉ. जयाजी नाथजी, जेष्ठ नगरसेवक श्री. रामचंद्रजी घरत, जेष्ठ नगरसेविका श्रीमती. शुभांगी पाटील, जेष्ठ नगरसेवक श्री. सुरजजी पाटील उपस्थित होते. १०० दिवसांच्या कालावधीत शहर विकासाला नवी दिशा देणारे जे महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय घेण्यात आले, त्यामध्ये समावेश आहे ..

**नवी मुंबई महानगरपालिका अर्थसंकल्प - २०२६ - २०२७.**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कर व पाणी पट्टीमध्ये कोणतीही करवाढ न करण्याचा महत्वपुर्ण निर्णय.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील गावठाण भागात गरजेपोटी केलेली व एलआयजीची बांधकामांना शास्ती न्युनतम ५% करण्याबाबतचा दिलासा दायक निर्णय मंजुर.

सर्वसमावेशक वायू प्रदूषण निर्मूलन व वायू गुणवत्ता सुधारणा कार्यक्रम मंजूर.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील गावठाण भागात गरजेपोटी केलेली व एलआयजीची बांधकामांना तिप्पट कर रदद करणे बाबत प्रस्ताव मंजुर.

नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण रुपांतरण धोरण २०२६ - मराठी माध्यम शाळांना इंग्रजी माध्यम शिक्षणात रूपांतरित करण्याचा एक महत्त्वाकांक्षी निर्णय.

महिला महापौर या नात्याने महिलांच्या सक्षमीकरणासाठी परिवहन सेवेमध्ये ''बसचालक'' म्हणून पहिल्या टप्प्यात महिलांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत ठोस पाऊल.

नवी मुंबईतील वाहतूक सुरळीत होण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रात सिटी मोर्बलिटी प्लॅन अंतर्गत उड्डाणपूल उभारणे व दुहेरी भुयारी मार्ग निर्माण करणे याविषयी महत्वाचा निर्णय.

नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण मंडळ स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव मंजुर.

नवी मुंबई महानगरपालिकेची पाणी पट्टी शुल्कावर ९० % सवलत देण्यास मान्यता.

नवी मुंबई महानगरपालिकेतील आरोग्य विभागात रुग्ण सहाय्यता कॉल सेंटर / डॅशबोर्ड बाबत महत्वाची भूमिका .

नवी मुंबई महानगरपालिकेतील ठोक मानधन / करार पध्दतीवरील कर्मचाऱ्यांचे समायोजन करणेबाबत निर्णय.

नवी मुंबई महानगरपालिका व सार्वजनिक बांधकाम विभाग यामध्ये संयुक्त समन्वय समिती स्थापन करणेबाबत निर्णय.

नवी मुंबई महानगरपालिका परिवहन कार्यरत कर्मचाऱ्यांना वेतनवाढबाबत निर्णय.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व प्रशिक्षणासाठी आर्थिक सहाय्य योजना.

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना'' लागू करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात येत असून याव्दारे कर्मचा-यांचा निवृत्तीवेतनाचा प्रश्न मार्गी लागणार. ''जनतेचा विश्वास विकासाचा ध्यास!'' ''नवी मुंबईच्या प्रगतीसाठी वचनबद्ध विकासाचा वेग अबाधित!

## यंदाच्या खरीप हंगामावर 'एल-निनो'चे सावट; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**मुंबई/प्रतिनिधी :** यंदाच्या खरीप हंगामावर 'एल-निनो'चे सावट असणार आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार यावर्षी राज्यात सरासरीच्या केवळ ८८ टक्के पाऊस पडण्याची शक्यता असून, याचा सर्वाधिक फटका पश्चिम विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राच्या काही भागांना बसेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी दिली. सह्याद्री अतिथीगृहावर आयोजित राज्यस्तरीय खरीप हंगाम पूर्व आढावा बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी या संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी राज्य सरकार सज्ज असल्याचे स्पष्ट केले.

## प्रियशीच्या लग्नाच्या धमकीला कंटाळून विवाहित तरुणाची आत्महत्या.. प्रियशी विरुद्ध गुन्हा नोंद




**केज/प्रतिनिधी :** येथील पंचायत समितीच्या पाठीमागे किरायाने राहणाऱ्या एका ३८ वर्षीय विवाहित तरुणाने प्रियशीच्या लग्नाचा दबाव, मानसिक त्रास व खोट्या गुन्ह्यात अडकविण्याच्या दिलेल्या धमकीला भिऊन केज येथील किरायाच्या राहत्या घरी गळफास घेवून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

याप्रकरणी मयताची पत्नी हिना अन्वर शेख च्या फिर्यादीवरून मृत तरुणाच्या प्रेयसीविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा केज पोलिसात नोंद करण्यात आला आला आहे. जाधव जवळा येथील हिना अन्वर शेख ( ह. मु.केज) यांनी पोलिसांत तक्रार दिली आहे की,त्यांचे पती अन्वर दिलावर शेख (वय ३८ वर्षे यांचे गावातीलच पूजा संभाजी गालफाडे हिच्यासोबत अनैतिक प्रेमसंबंध होते. या त्रासाला कंटाळून शेख कुटुंब केज येथे राहण्यास आले होते. मात्र, पूजा गालफाडे ही अन्वर यांना वारंवार फोनवर मेसेज करून तु तुझ्या बायकोला सोडून दे, व माझ्याशी लग्न कर, नाहीतर तुझ्या विरुद्ध अॅट्रॉसिटीचा गुन्हा नोंद करीन, अशी धमकी देऊन प्रियसी मानसिक व शारीरिक छळ करीत होती.

मुलांना सुट्ट्या लागल्यामुळे अन्वर यांनी मुलांसह, पत्नीला १६ मे रोजी अहिल्यानगर येथे बहिणीकडे सोडले व तो स्वतः केज येथील घरी परत आला १८ मे रोजी सकाळी हिनाने कॉल केला असता पतीचा फोन लागला नाही. त्यामुळे त्यांनी सासऱ्यांना घरी पाहण्यास सांगितले. सासऱ्यांनी खिडकीतून पाहिले असता अन्वर यांनी छताच्या पंख्याला कापडी शॉलने गळफास घेतल्याचे उघड झाले. पूजा गालफाडे हिच्या सततच्या धमक्यांमुळे मानसिक तणावात येऊन अन्वर यांनी आत्महत्या केली. या प्रकरणी केज पोलिसात गुन्हा दाखल केला असून पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम हे पुढील तपास करत आहेत.

## राज्यपालांच्या हस्ते भिकू इदाते, रवींद्र प्रभूदेसाई यांच्या पुस्तकांचे प्रकाशन




**मुंबई/प्रतिनिधी :** भटके विमुक्त विकास परिषदेचे संस्थापक अध्यक्ष व समरसता मंचचे दीर्घ काळ कार्याध्यक्ष राहिलेले पद्मश्री भिकू (दादा) इदाते यांच्या इंग्रजी अनुवादित 'पिलग्रीम ऑफ समरसता' या ग्रंथाचे प्रकाशन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते लोकभवन मुंबई येथे झाले. नीलिमा देशपांडे यांनी दादा इदाते यांच्या जीवन कार्यावर लिहिलेल्या 'समरसतेचा वारकरी' या ग्रंथाचे सदर ग्रंथ हे इंग्रजी भाषांतर असून ऋतुराज पत्की यांनी ते अनुवादित केले आहे. ग्रंथाला सरसंघचालक डॉ मोहन भागवत यांची प्रस्तावना आहे.

राज्यपालांच्या हस्ते उद्योजक तसेच पितांबरी समूहाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ रवींद्र प्रभूदेसाई यांच्या 'आधुनिक शेतीचे मॉडेल' व 'आपलं कोकण' या दोन पुस्तकांचे देखील लोकभवन येथे प्रकाशन करण्यात आले.

भिकू इदाते यांच्या पुस्तकामुळे वाचकांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या समरसता तसेच इतर आंदोलनाची माहिती होईल आज तंत्रज्ञानाच्या काळात देखील ग्रंथांचे महत्त्व कायम असून ग्रंथ हाती धरून वाचणे हा अद्भुत अनुभव असतो असे राज्यपालांनी सांगितले. नवी पिढी ग्रंथ वाचन करीत नाही हा समज चुकीचा आहे असे सांगून नव्या पिढीने वाचनाचे केवळ व्यासपीठ बदलले आहे. वाढदिवस तसेच विवाह प्रसंगी ग्रंथ भेट देण्याची प्रथा सुरू व्हावी अशी अपेक्षा राज्यपालांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.

लेखक भिकू इदाते यांनी आपल्या प्रास्ताविकातून समरसता मंचाची निर्मिती, त्या माध्यमातून हाती घेतलेली वेगवेगळी आंदोलने, फुले-आंबेडकर संदेश यात्रा, विमुक्त व भटक्या समाजाची स्थिती इत्यादी विषयांवर विवेचन केले.

'पितांबरी'चे रवींद्र प्रभुदेसाई यांनी 'आधुनिक शेतीचे मॉडेल' व 'आपलं कोकण' या ग्रंथांविषयी माहिती दिली.

पुस्तक प्रकाशन सोहळ्याला हिंदुस्तान प्रकाशन संस्था व साप्ताहिक विवेकचे मार्गदर्शक पद्मश्री रमेश पतंगे तसेच साप्ताहिक विवेक तसेच पितांबरी उद्योग समूहातील संचालक उपस्थित होते.

## पत्नीला जिवंत जाळणाऱ्या पतीला जन्मठेप; माणगाव जिल्हा सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल


अलिबाग/प्रतिनिधी : पत्नीच्या अंगावर पेट्रोल ओतून तिला जिवंत पेटवून खून केल्याप्रकरणी पतीला माणगाव जिल्हा सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. दिपक अशोक झांजे (वय ३६) असे दोषी ठरलेल्या आरोपीचे नाव असून, न्यायालयाने त्याला चार हजार रुपयांचा दंडही ठोठावला आहे. दंड न भरल्यास चार महिने सक्तमजुरीची शिक्षा भोगावी लागणार आहे.ही धक्कादायक घटना ३१ डिसेंबर २०२१ रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास महाड तालुक्यातील ढालकाठी येथील आरोपीच्या राहत्या घरी घडली होती. कौटुंबिक कारणातून झालेल्या वादानंतर आरोपी दिपक झांजे याने पत्नी निशा झांजे (वय २८) यांच्या अंगावर प्लास्टिकच्या बाटलीतून पेट्रोल ओतले आणि माचिसच्या सहाय्याने त्यांना पेटवून दिले. गंभीर भाजलेल्या निशा झांजे यांना तातडीने उपचारासाठी मुंबई येथील कस्तुरबा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सुरुवातीला या प्रकरणी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३०७, ३२३ आणि ५०४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, उपचारादरम्यान ६ जानेवारी २०२२ रोजी निशा झांजे यांचा मृत्यू झाल्यानंतर पोलिसांनी गुन्ह्यात भादंवि कलम ३०२ ची भर घातली. दरम्यान, उपचार सुरू असताना पोलिसांनी निशा झांजे यांचा मृत्युपूर्व जबाब नोंदवला होता. या जबाबात त्यांनी पतीनेच कौटुंबिक वादातून पेट्रोल ओतून आग लावल्याचे स्पष्ट नमूद केले होते.

# राहुलभैया सोनवणे यांची बीड जिल्हा काँग्रेस अध्यक्षपदी सलग दुसऱ्यांदा फेरनिवड!

## खा. रजनीताई पाटील यांच्या निष्ठावंताला पुन्हा संधी; कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह!

**केज/प्रतिनिधी :** राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी राहुल(भैया) सोनवणे यांची पुन्हा एकदा अत्यंत प्रतिष्ठेची फेरनिवड करण्यात आली आहे.

काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस (जनरल सेक्रेटरी) के. सी. वेणुगोपाल यांनी त्यांच्या नियुक्तीचे अधिकृत पत्र जारी केले आहे. राहुल(भैया) यांच्या या फेरनिवडीमुळे बीड जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, राजकीय आणि सामाजिक स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राहुल(भैया)सोनवणे हे राज्यसभेच्या खासदार रजनीताई पाटील यांचे खंदे समर्थक म्हणून ओळखले जातात.



पाटील घराण्याशी असलेल्या त्यांच्या दीर्घकालीन एकनिष्ठतेची, पक्षाप्रती असलेल्या प्रामाणिक कार्याची आणि कुशल संघटन कौशल्याची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी पुन्हा एकदा त्यांच्या खांद्यावर जिल्हाध्यक्षपदाची महत्त्वाची धुरा सोपवली आहे.

जनआंदोलनांतील सक्रिय सहभाग आणि सर्वसमावेशक नेतृत्व गेल्या कार्यकाळात राहुल(भैया)यांनी जिल्ह्यात काँग्रेस संघटना तळागाळापर्यंत मजबूत करण्यासाठी मोठे प्रयत्न केले. मराठा आरक्षण आंदोलन, देशातील वाढती महागाई, आणि शेतकऱ्यांच्या विविध ज्वलंत प्रश्नांवर त्यांनी नेहमीच रस्त्यावर उतरून आक्रमक संघर्ष केला आहे. ओबीसी समाजातील लहान-मोठ्या सर्व जाती-जमातींमधील लोकांना एकत्र घेऊन चालण्याची त्यांची हातोटी जिल्ह्यात सर्वपरिचित आहे.

गंगा माऊली शुगरच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा विकास केवळ राजकारणच नव्हे, तर समाजकारण आणि सहकार क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा मोठा ठसा उमटवला आहे. केज तालुक्यातील उमरी येथील गंगा माऊली शुगरच्या माध्यमातून त्यांनी युसुफवडगाव सर्कलसह परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वेळोवेळी योग्य भाव देऊन आर्थिक न्याय मिळवून दिला. त्यांच्या या शेतकरीभिमुख धोरणामुळे परिसरात एक प्रकारे हरितक्रांती आकारास आली असून, ते शेतकऱ्यांचे हक्काचे कैवारी बनले आहेत.

''पक्षश्रेष्ठींनी आणि खासदार रजनीताई पाटील यांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्याला तडा जाऊ न देता जिल्ह्यात काँग्रेस पक्ष अधिक मजबूत करण्यासाठी आणि सर्वसामान्य, गरीब व शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी मी कटिबद्ध राहीन.''

राहुल(भैया)सोनवणे (नवनियुक्त जिल्हाध्यक्ष, बीड जिल्हा काँग्रेस)

राहुलभैया सोनवणे यांच्या या फेरनिवडीमुळे बीड जिल्ह्यातील आगामी राजकीय समीकरणांना नवी दिशा मिळणार असून, त्यांच्या या निवडीचे राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रातून जोरदार स्वागत केले जात आहे.

# स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाचे २४ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र



**लातूर/प्रतिनिधी :** जेएसपीएम संचालित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता ५ वी मधील २४ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये पात्र झाले असून त्यांच्या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाच्या इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये श्रवण तोंडारे २३४ गुण, महावीर गायकवाड २१८, सृष्टी लखादिवे २१०, विराज शेख २०६, श्ती सुरवसे १९२, शुभ्रा मोरे १९०, वेदिका सूर्यवंशी १८८, भाग्यश्री बिराजदार १८४, प्राची लहाडे १६०, आरोही कराड १५८, प्राप्ती मुंडे १५६, साईराज विठूबोने १५६, तनिष्का सुरवसे १५४, सई साळुंके १५०, अनुष्का सोनवंशी १५०, सार्थक निरने १५०, आर्यन मगर १४४, राधा डिसले १४४, गौरव सुवर्णकार १४२, शौर्यराणी बनसोडे १४२, विश्वजीत जगदाळे १३२, शिवम शेप १३२, सुशांत कोडामंगले १३०, शिवप्रसाद करपे १२८ या प्रमाणात गुण घेऊन विद्यार्थ्यांनी यश मिळवलेले आहे. त्याच्या यशाबद्दल जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेच्या सचिव तथा माजी जि.प.अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर, संस्थेचे उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, संस्थेचे कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, शैक्षणिक समन्वयक संभाजीराव पाटील,समन्वयक विनोद जाधव, समन्वयक बापूसाहेब गोरे,प्राचार्य गोविंद शिंदे, प्राथमिकचे मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी यांच्यासह शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# अकरावी प्रवेशाचा खेळखंडोबा! पहिल्याच दिवशी सर्व्हर ठप्प, वेबसाईट क्रॅशमुळे गोंधळ

**भंडारा/प्रतिनिधी :** दहावीचा निकाल लागल्यानंतर अकरावीच्या प्रवेशासाठी उत्सुक असलेल्या विद्यार्थ्यांच्या आनंदावर शिक्षण विभागाच्या भोंगळ नियोजनाने अक्षरशः पाणी फेरले. राज्यभर बुधवार, २१ मे पासून सुरू झालेल्या अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्याच दिवशी वेबसाईट काही वेळातच बंद पडल्याने भंडारा जिल्ह्यात प्रचंड गोंधळ उडाला. सायबर कॅफे आणि महा-ई-सेवा केंद्रांवर विद्यार्थ्यांच्या रांगा लागल्या, तर सर्व्हर क्रॅशमुळे अर्ज अर्धवट राहत असल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

वेबसाईटची गती संथ

महाराष्ट्र राज्य मंडळाच्या मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता ११ वीचे प्रवेश यंदाही केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने सुरू करण्यात आले आहेत. भंडारा जिल्ह्यात १४७ कनिष्ठ महाविद्यालय असून २०, ३०० प्रवेश जागा उपलब्ध आहेत. २१ मे ते २८ मे या कालावधीत विद्यार्थ्यांना ऑनलाईन नोंदणी करून १ ते १० महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरायचे आहेत. मात्र, आज २१ मे रोजी सकाळी आठ वाजता ही प्रवेश प्रक्रिया सुरू होताच वेबसाईट संथ गतीने चालू लागली आणि काही वेळातच पूर्णपणे ठप्प झाली. त्यामुळे विद्यार्थ्यांना लॉगिन, अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड करणे आणि महाविद्यालयांची निवड करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला.

शिक्षण विभागाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह

विशेष म्हणजे, १९ मे सकाळी ११ वाजेपासून ते २० मे सायंकाळपर्यंत शिक्षण विभागाकडून सराव सत्र (प्रॅक्टिस सेशन) घेण्यात आले होते. त्यामुळे यंदा वेबसाईट सुरळीत चालेल, अशी अपेक्षा विद्यार्थ्यांना आणि पालकांना होती. मात्र प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्याच दिवशी सर्व्हर कोलमडल्याने शिक्षण विभागाच्या नियोजनावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मागील वर्षीदेखील अशाच प्रकारच्या तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यानंतरही प्रशासनाने कोणताही धडा घेतला नसल्याचा आरोप पालकांकडून केला जात आहे.

Aभंडारा जिल्ह्यात सकाळपासूनच विविध सायबर कॅफे, महा-ई-सेवा केंद्र आणि संगणक प्रशिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठी गर्दी केली होती. मात्र वेबसाईट बंद पडत असल्याने अनेक विद्यार्थी तासन्तास प्रतीक्षा करत बसले होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंटरनेट आणि तांत्रिक सुविधांचा अभाव असल्याने अधिक फटका बसत आहे. विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून प्रवेश प्रक्रियेत तांत्रिक अडथळे निमाण होत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या हितासाठी प्रवेश नोंदणीची मुदत किमान दोन दिवसांनी वाढवावी, अशी मागणी नूतन कन्या कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक नदीम खान यांनी केली आहे.दरम्यान, २६ मे रोजी पहिली गुणवत्ता यादी प्रसिद्ध होणार असून २७ मे पासून प्रवेशाच्या फेऱ्या सुरू होणार आहेत. मात्र सध्याच्या गोंधळामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम आणि पालकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# एनसीपी चे प्रवक्ते विकास लवांडेंना नेमकी अटक कशामुळे? अखेर कारण आले समोर, शाई फेकणाऱ्या संग्राम भंडारेंनीही डिवचले

पुणे/प्रतिनिधी : वारकरी संप्रदाय विषयी चिथावणीखोर वक्तव्य केल्या प्रकरणी राष्ट्रवादीचे प्रवक्ते विकास लवांडे यांना अटक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, लवांडे यांच्यावर शाईफेक करणारे संग्राम भंडारे यांच्यावर अद्याप पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नाही. त्याच संग्राम भंडारे यांनी पोलिसांच्या कारवाईचं कौतुक केलं आहे. 'आज वारकरी आणि हिंदू धर्माने कायद्या मदतीतून लवांडे यांचं तोंड काळं केलं, असं

# गाव सुसंस्कृत ठेवायचं तर गावातली सांस्कृतिक चळवळ जीवंत असायला हवी - जेष्ठ अभिनेते मिलिंद शिंदे

## नाट्यपरिषदेचे दिमाखदार पुरस्कार वितरण संपन्न





**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेच्या लातूर महानगर शाखेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांचे वितरण बुधवारी पार पडले. भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात झालेल्या पुरस्कार सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ अभिनेते मिलिंद शिंदे उपस्थित होते.

या सोहळ्यात स्व. रंगकर्मी बंकट पुरी पुरस्कार अभिनेता संकर्षण कऱ्हाडे यांना, रंगमंचीय कार्य गौरव पुरस्कार अभिनेत्री निलम शिर्के - सामंत यांना तर स्व. विजयकुमार धायगुडे रंगकर्मी पुरस्कार श्री प्रदीप भोकरे यांना प्रदान करण्यात आला. यावेळी नाट्यपरिषदेच्या मध्यवर्ती मुंबई शाखेचे प्रतिनिधी म्हणून श्री सतीश लोटके उपस्थित होते.

यात्रसंगी बोलताना श्री मिलिंद शिंदे म्हणाले की, नाट्य संमेलनं, साहित्य संमेलनं, पुरस्कार वितरण सोहळे, बालनाट्य महोत्सव असे कार्यक्रम वारंवार व्हायला हवेत. कारण गाव सुसंस्कृत ठेवायचं तर गावातली सांस्कृतिक चळवळ जीवंत असायला हवी आणि त्यासाठी असे समारंभ वारंवार होणे आवश्यक आहे. त्यातूनच माणसांची मने तयार होतात.

पुरस्काराला उत्तर देताना श्री संकर्षण कऱ्हाडे म्हणाले की, हा पुरस्कार म्हणजे माझ्यासारख्या मराठवाड्याच्या सुपुत्राचा घरातला कौतुक सोहळा आहे.. ज्यामुळे मला भविष्यात अभिनय क्षेत्रात वावरताना नवी भरारी घेण्याचं बळ मिळणार आहे.

तर श्रीमती निलम शिर्के म्हणाल्या की, बालरंगभूमी परिषदेच्या कार्याचा हा गौरव आहे. तो केवळ माझा नाही तर महाराष्ट्रातल्या हजारो बालकलाकारांचा हा सन्मान आहे.

श्री भोकरे पुरस्काराला उत्तर देताना म्हणाले की, मी शब्दात उत्तर देणार नाही तर इथून पुढे लातूरच्या नाट्यचळवळीला अधिक बळकटी देण्यासाठी अधिक कार्यरत रहाणं हेच उत्तर होऊ शकेल.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात भूमिका मांडताना नाट्यपरिषद महानगर शाखेचे अध्यक्ष ॲड. शैलेश गोजमगुंडे म्हणाले की, शाखा स्थापन झाल्यापासून शाखेने इतिहासात पहिल्यांदाच लातुरात नाट्य संमेलन आयोजित केले. राज्यनाट्य स्पर्धेचं केंद्र मंजूर करुन घेतलं आणि आता वार्षिक पुरस्कार सोहळा सुरु केला. लातूरच्या सांस्कृतिक जडण घडणीत आम्ही कायम कार्यरत राहू.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दिवंगत रंगकर्मी कल्याण वाघमारे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रा. शशी देशमुख यांच्या चमुने गायलेल्या नांदीने सोहळ्याची सुरुवात झाली. स्व. रंगकर्मी बंकट पुरी यांच्याविषयी व स्व. विजयकुमार धायगुडे यांच्याविषयी अनुक्रमे अनील पुरी व अश्विनी धायगुडे यांनी माहिती विषद करत, पुरस्कार देण्यामागची भूमिका स्पष्ट केली.

सर्व पुरस्कार्थिंचा यथोचित सन्मान करताना त्यांना स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र प्रदान करत कमलपात्रात मोगऱ्याची फुले व शंभु महादेवाची पिंड व अभय कुलकर्णी लिखित दानपत्र ही कादंबरी देण्यात आली.

सन्मानपत्राचे वाचन अनुक्रमे प्रमोद कांबळे, डॉ. संतोष कुलकर्णी आणि वसुधा पाटील यांनी केले. आभार डॉ. दिपक वेदपाठक यांनी मानले, पार्श्वसंगीताची बाजू आकाश बाभळे यांनी सांभाळली. तर ओघवत्या भाषेत, सुबक व नेटकं सूत्रसंचालन कुमुदिनी भार्गव यांनी केले. शाहीर तुकाराम सुवर्णकार यांनी गायलेल्या पसायदानाने कार्यक्रमाचा शेवट झाला. सोहळ्यास लातूरकरांनी गर्दी केली होती.

या सोहळ्याच्या यशस्वितेसाठी महानगर शाखेच्या उपाध्यक्षा अर्चना पोपडे, बालरंगभूमी परिषदेचे अध्यक्ष रणजित आचार्य, कोषाध्यक्ष रवी आघाव, सुमती बिडवे - सोमवंशी, राजीव गड्डीमे, अभिषेक शिंदे, विशाल वाटवडे, पृथ्वीराज चव्हाण, भीम दुनगावे, कृष्णा खानापुरे, राम रेड्डी, प्रिती ठाकूर, योगिता जाधव, महेक अन्सारी, मयुरी वाघमारे, तृप्ती रणसुभे, महेश बिडवे आदींनी परिश्रम घेतले.

# राज्यपालांकडून अधिकारी, कर्मचारी यांना दहशतवाद विरोधी प्रतिज्ञा



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी दहशतवाद विरोधी दिनानिमित्त लोकभवनातील अधिकारी व कर्मचारी यांना दहशतवाद विरोधी प्रतिज्ञा दिली.

अहिंसा व सहिष्णुतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा सर्वशक्तीनिशी मुकाबला करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांचा स्मृतिदिन दहशतवाद विरोधी दिवस म्हणून पाळण्यात येतो.

राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सहसचिव एस. राममूर्ती, परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे यांसह लोकभवनातील कर्मचारी व अधिकारी तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार यावेळी उपस्थित होते.

# एकनाथ शिंदेंकडून २०२९ साठी स्वबळाची चाचपणी?



**मुंबई/प्रतिनिधी :** आगामी काळातील राजकीय आव्हाने आणि भविष्यातील निवडणुकांचा वेध घेत शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आतापासूनच २०२९ च्या विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. पक्षाची पाळेमुळे तळागाळापर्यत अधिक मजबूत करण्यासाठी शिवसेनेकडून राज्यभरात संघटनात्मक पुनर्रचना आणि बांधणी राबवली जात असून, २८८ मतदारसंघांपैकी तब्बल २०० विधानसभा मतदारसंघांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या संपूर्ण मोहिमेची सूत्रे उद्योगमंत्री उदय सामंत आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याकडे सोपवण्यात आली आहेत.

या मोहिमेअंतर्गत शिवसेनेने संपूर्ण राज्याचे संघटन पातळीवर चार प्रमुख विभागांमध्ये वर्गीकरण केले असून, प्रत्येक विभागाची जबाबदारी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडे सोपवण्यात आली आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे विदर्भ आणि मराठवाडा या दोन अत्यंत महत्त्वाच्या आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील अशा मोठ्या क्षेत्रांची जबाबदारी देण्यात आली आहे, तर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याकडे मुंबई महानगर आणि पश्चिम महाराष्ट्रातील पक्षाच्या विस्ताराचा सुकाणू सोपवण्यात आला आहे.

याव्यतिरिक्त उत्तर महाराष्ट्राची जबाबदारी मंत्री दादा भुसे आणि गुलाबराव पाटील, तर कोकण पट्ट्याची धुरा माजी मंत्री दीपक केसरकर यांच्याकडे देण्याचे निश्चित झाले आहे. हे सर्व प्रमुख नेते आपापल्या नियुक्त क्षेत्रांमध्ये जाऊन केवळ स्थानिक पातळीवरील संघटनात्मक स्थितीचा आढावा घेतील, तसेच पक्षाच्या शाखा अधिक बळकट करणे आणि तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये थेट समन्वय निर्माण करण्यासाठी विशेष दौरे करणार आहेत.

शिवसेनेच्या या रणनीतीमागे प्रामुख्याने २०२९ मधील विधानसभा निवडणुकांचे गणित दडलेले आहे. महायुतीमध्ये भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस या मित्रपक्षांसोबत काम करत असताना, जागावाटपामध्ये किंवा राजकीय वाटाघाटींमध्ये शिवसेनेची बाजू वरचढ राहावी, यासाठी आत्तापासूनच जमिनीवर मोठी ताकद निर्माण करणे आवश्यक असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मत आहे. म्हणूनच पक्षाने ठरवलेल्या २०० मतदारसंघांमध्ये विशेष संपर्क अभियान चालवले जाणार आहे, ज्यामध्ये प्रत्येक मतदारसंघात किमान १० हजार ते १५ हजार सक्रिय कार्यकर्त्यांचे जाळे विणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हे कार्यकर्ते शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजना सर्वसामान्यांपर्यत पोहोचवण्याचे काम करतील.

# कर्जवाटप करताना शेतकऱ्यांकडून 'सिबिल स्कोअर'ची सक्ती करू नये- मुख्यमंत्री फडणवीस यांचे बँकांना निर्देश



**मुंबई/प्रतिनिधी :** येत्या ३० जूनपूर्वी सर्व पात्र शेतकऱ्यांची कर्जमाफी पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. त्यामुळे आगामी खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना नव्याने पीककर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केले. ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्यस्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक पार पडली. या बैठकीनंतर राज्यातील शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची घोषणा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र, पत्रकार परिषदेत फडणवीस यांनी तशी कोणतीही घोषणा केली नाही. तरीही कर्जमाफीबाबत सरकार सकारात्मक असल्याचे संकेत देत त्यांनी ही घोषणा नेमकी कधी होणार, याबाबतची संभाव्य तारीख स्पष्ट केली आहे.

आपण ३० जूनपूर्वी कर्जमाफी करत आहोत. त्यामुळे पुढील हंगामासाठी जास्तीत जास्त शेतकरी पात्र ठरतील. बहुतांश शेतकरी जूनच्या शेवटी कर्ज घेत असतात. त्यामुळे यंदा अधिक शेतकऱ्यांना याचा लाभ मिळेल,'' असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं. त्याचबरोबर ''बँकांना आम्ही सूचना दिल्या आहेत की, सरकारकडून अंतिम यादी मंजूर झाल्यानंतर निधी जमा होण्यास विलंब झाला तरी पात्र शेतकऱ्यांना कर्ज द्यावं. कारण, सरकारचे पैसे बँकांना मिळणारच आहेत. विलंब झाल्यास त्यावरील व्याजही दिलं जाईल,'' असंही फडणवीस यांनी सांगितलं. तसेच, ''जे थकित कर्जदार आहेत, त्यांची कर्जं आम्ही माफ करणार आहोत,'' अशी सरकारची भूमिका त्यांनी मांडली.

राज्य सरकारनं काही दिवसांपूर्वी कर्जमाफीची घोषणा केली होती. मात्र, अंमलबजावणीची स्पष्ट तारीख जाहीर न झाल्यानं शेतकरी आणि बँकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. विरोधकांकडूनही सरकारवर टीका होत होती. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी ३० जूनपूर्वी कर्जमाफी पूर्ण करण्याची घोषणा केली.

शेतकऱ्यांना सिबिल स्कोअरची' सक्ती न करण्याचे बँकांना निर्देश - राज्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्यात आल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं. जिल्हा सहकारी आणि ग्रामीण बँकांकडून सुमारे ६७ टक्के कृषी कर्जवाटप केले जाते. तर राष्ट्रीयीकृत बँकांचा वाटा २६ टक्के आहे. मात्र, राष्ट्रीयीकृत बँकांकडून कृषी कर्जवाटपाचे ८० टक्के उद्दिष्टही पूर्ण होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करत मुख्यमंत्र्यांनी संबंधित बँकांना लक्ष्यपूर्तीचे निर्देश दिले.

कर्जवाटप करताना शेतकऱ्यांकडून 'सिबिल स्कोअर'ची सक्ती करू नये किंवा कोणतीही अडचण निर्माण करू नये, असे निर्देशही देण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. कर्जमाफीसंदर्भात सर्व बँकांशी चर्चा झाली आहे. आवश्यक माहिती कोणत्या स्वरूपात सादर करायची, याबाबतही नियोजन करण्यात आल्याचं त्यांनी नमूद केले.

राज्यात ८८ टक्के पावसाचा अंदाज यंदा 'एल निनो'मुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला असून, सरासरीच्या केवळ ८८ टक्के पाऊस होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे पिकांवर ताण वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन हवामानानुसार नियोजन करण्यात येत असल्याचे फडणवीस यांनी सांगितलं. जलयुक्त शिवार योजनेच्या कामांनाही गती देण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं.

खत उत्पादनावर ताण येण्याची शक्यता- शेतकऱ्यांसाठी 'महाविस्तार' ॲप सुरू करण्यात आलं आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पीक पद्धती, हवामान आणि शेतीविषयक मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे. शेतकरी थेट प्रश्न विचारू शकतील आणि त्यांना आवश्यक माहिती ॲपवर मिळेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. खतांच्या उपलब्धतेवर सरकारचे लक्ष असल्याचं सांगताना त्यांनी जागतिक परिस्थितीमुळे यंदा खत उत्पादनावर ताण येण्याची शक्यता व्यक्त केली. कृषी क्षेत्रासाठी असलेली खतं औद्योगिक वापरासाठी वळवली जात नाहीत ना, यावर देखरेख ठेवण्यासाठी व्हिडिओग्राफीद्वारे निरीक्षण केलं जाणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.